# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २९.०४.२०१८ (का.प.क्र.११) रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष सभेचे इतिवृत्त.**

रविवार दिनांक २९.०४.२०१८ रोजी (दिनांक २६.०४.२०१८ रोजीची पुढे ढकलण्यात आलेली सभा, का.प.क्र.११) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय विशेष सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ११.४० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ५. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ६. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ७. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ८. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| ९. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १०. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| ११. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| १२. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| १३. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| १४. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| १५. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| १६. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| १७. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| १८. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| १९. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| २०. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| २१. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| २२. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| २३. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| २४. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| २५. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| २६. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| २७. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| २८. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| २९. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |

| | |
|---|---|
| ३०. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ३१. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ३२. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ३३. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ३४. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ३५. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ३६. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ३७. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ३८. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ३९. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव

मा.महापौर :आजच्या विशेष सभेला मा.आयुक्त उपस्थित नाही. त्यांचे वतीने अतिरिक्त आयुक्त काम पाहतील. आजचा विषय सचिव यांनी वाचन करावा.

श्री.गोकुळसिंग मलके :आज अर्थसंकल्पाची बैठक असून सभापतीवर आम्हाला शंका आहे, जर ओपनमध्ये ते विश्वासघात करू शकतात, तर अर्थसंकल्पात किती विश्वासघात झाला असेल, यात आम्हाला शंका आहे. स्थायी समिती मध्ये वर्षामध्ये जे प्रस्ताव मंजूर झाले. त्यात मोठा घोळ झालेला आहे. अर्थसंकल्प सभापती यांचे हस्ते सादर करून घेऊ नये. आपण स्वत: हातात घेऊन बजेट सादर करावे. कारण हे विश्वासघातकी व्यक्ती आहे. जेंव्हा आमच्यावर विश्वासघात करू शकतो.

मा.महापौर :सभागृहात एखाद्या सदस्याच्या बाबतीत असे बोलतांना शब्द बरोबर वापरायचे असतात. विनंती, सभागृहात असे बोलू नये.

श्री.विकास जैन :शब्द निट वापरायचे सांगावे. असे बोलणे योग्य नाही.

श्री.गोकुळसिंग मलके :हे विश्वासघातकी व्यक्ती आहे. ओपन मध्ये त्यांनी विश्वास घात केला आहे.

श्री.राहूल सोनवणे :तुम्ही आम्हाला असे बोलू शकत नाही. आम्हाला बोलण्याचे अधिकार दिले आहे.

श्री.विकास जैन :हा सभागृहाच्या बाहेरचा विषय आहे सभागृहात जे आहे ते बोलावे. शब्द चागंले वापरावे.

या वेळी सभागृहात सदस्य एकाच वेळी बोलत असतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :सभागृहाची शिस्त पाळावी लागेल. कृपया एक एक सदस्यांनी बोलावे.

श्री.गोकुळसिंग मलके :विनंती की, अर्थसंकल्प सभापती यांचे हस्ते सादर करून घेऊ नये.

मा.महापौर :सभागृहाचे कामकाज मी नियमानुसार करणार आहे. जे काही करायचे ते नियमाच्या चौकटीत राहून करणार आहे.

श्री.गोकुळसिंग मलके :एक नंबरचे भ्रष्टाचारी व्यक्ती आहे. त्यांची काय गरज आहे. भ्रष्टाचारी व्यक्ती आहे. त्यांनी आम्हाला धोक्यात टाकले आहे.

या वेळी डायस समोर सदस्य जमा होतात. मोठमोठ्याने बोलतात.

मा.महापौर :अशा प्रकारचे आरोप करू नये. विनंती की, आपण बसून जावे. सचिव आता विषय पत्रिकेचे वाचन करावे.

श्री.विकास जैन :ही बजेटची बैठक आहे. रेग्युलर सभा नाही. इतर विषयावर बोलणे योग्य नाही.

श्री.गोकुळसिंग मलके :कायद्यात तरतुद असेल तर आपण बजेट स्वीकरावे सभापती यांचे हातून बजेट घेऊ नये.

**<u>विषय क्रमांक ४३१:-</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये स्थायी समितीने संमत केलेले सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ या वर्षाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करून महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमाचे कलम १०० अन्वये अंतिम मान्यता देणे.

मा.महापौर :स्थायी समितीचे स.सदस्य व सभापती यांना विनंती की डायस वर यावे मा.सभापती अर्थसंकल्प महापौराकडे सादर करणार आहे.

श्री.गोकुळसिंग मलके :सभापती यांचे हाताने बजेट सादर करून घेऊ नये. आपण सभागृहाचे प्रमुख आहेत.

मा.महापौर :आपल्या सुचनेची नोंद घेतली आहे. प्रशासनाचे वतीने लेखाधिकारी हे माहिती देतील.

लेखाधिकारी :२०१७-२०१८ चे सुधारीत व २०१८-१९ चे मुळ अर्थसंकल्प मा.सभापती यांनी सादर करावा. अशी विनंती करतो.

श्री.गोकुळसिंग मलके :विनंती सभापती यांचे हातून बजेट घेऊ नये.

श्री.राहूल सोनवणे :बजेटवर आम्ही बहिष्कार टाकला आहे.

(या वेळी डायस समोर सदस्य जमा होतात व मोठमोठयाने सभापती, महापौर हाय-हाय अशा घोषणा देतात. सर्व सदस्यांनी जागेवर बसावे, सुचना करूनही सदस्य जागेवर बसत नव्हते.)

मा.महापौर :वारवांर सुचना करूनही जागेवर बसत नाही हे योग्य नाही. त्यामुळे स.सदस्य श्री.कैलास गायकवाड, श्री.राहूल सोनवणे, श्री. रमेश जायभाय, श्री.गोकुळसिंग मलके यांचे सभासदत्व रद्द करण्यात येते. तुमचे चौघांचे सभासदत्व रद्य केले आहे.

श्री.राहूल सोनवणे :जातीवाद करीत आहे. हे योग्य नाही.

(त्यानंतर काही सदस्य सभागृहाच्या बाहेर निघून जातात.)

(यावेळी मा.सभापती श्री.गजानन बारवाल मा.महापौरांकडे अर्थसंकल्प सादर करतात.) मा.महापौर,मा.सभापती व सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.

मा.महापौर :नगर सचिव व उपआयुक्त (प्र.) यांना आदेशीत करण्यात येते की, जो प्रकार आत्ताच झाला, त्याचे सर्व चित्रीकरण जे काही सीसीटीव्ही कॅमेराचे फुटेज असतील फोटोग्राफर्स् असतील सर्व बघून तपासून घ्यावे. तसेच कायदेशीर बाबी तपासून जो झालेला प्रकार आहे. त्याचा ०२ तारखेपर्यत ११-०० वाजेपर्यत माझेकडे अहवाल द्यावा. उपआयुक्त प्रशासन या प्रकरणाचे चौकशी अधिकारी असतील जे काही चौकशी अहवालामध्ये आक्षेपार्ह मुद्दे असतील, त्यानुसार कार्यवाही सुध्दा प्रस्तावित करावी. प्रशासनाला सुचना करण्यात येते की, कायद्याच्या चौकटीत राहून सभेचे कामकाज सुरू होत असेल व अशावेळी कोणीही सदस्य अशा प्रकारचे वर्तन करीत असेल तर त्यांचे वर योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करावी.

(या वेळी मा.सभापती हे मा.महापौर, उपमहापौरांचे, मा.सभागृह नेता व गटनेते यांचे स्वागत करतात.)

लेखाधिकारी :सभापती यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करावे

मा.सभापती :प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१७-२०१८ चे सुधारीत व कलम ९५ नुसार सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाज दिनांक २६ मार्च २०१८ रोजी स्थायी समितीसमोर सादर करण्यात आले होते.

स्थायी समितीच्या सभेत आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सर्व स.सदस्यांनी अभ्यासपूर्ण चर्चा करून प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर फेरफार व दुरूस्ती करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार त्यास मान्यता प्रदान केली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० नुसार अंतिम मान्यतेस्तव छत्तीसावा अर्थसंकल्प मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करीत आहे.

सभापती या नात्याने या पंचवार्षिक कालावधीमधील तीसरा अर्थसंकल्प असून सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता व मागील वर्षी निधी अभावी विकासाची कामे अल्प प्रमाणात झालेली असल्यामुळे, नागरीकांची महानगरपालिकेच्या प्रति तसेच सर्व सदस्यांची असलेली नाराजी लक्षात घेता या अर्थसंकल्पामध्ये सर्व समावेषक प्रभागात विकास कामे करण्याच्या मोठया प्रमाणावर मानस आहे. तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची व नाजुक असून सुद्धा वरील बाबी लक्षात घेऊन सर्व प्रभागामध्ये मूलभुत सुविधा पुरविण्याच्या भावनेतून विकास कामे करण्यासाठी भरीव तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

शहरात जी.पी.एस. प्रणालीद्वारे मालमत्ता करात वाढ करण्याचा मानस आहे व या करीता सदर प्रणाली द्वारे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. दरम्यानच्या काळात मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये सुसुत्रता यावी व प्रभावीपणे वसुली करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागातील कार्यरत कर्मचारी यांचा आढावा घेऊन या विभागासाठी वाढीव व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात यावा व त्यांच्याकडून वसूली वाढविण्यासाठी प्रयत्न करावे.

शासनाने रु.१००.०० कोटीचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे तसेच रक्कम रूपये ५०.०० कोटीच्या रस्त्याची कामे डिफर्ड पेमेंट अंतर्गत करण्यात येणार असुन एकुण रक्कम रूपये १५०.०० कोटीच्या निधीमधुन शहरातील मुख्य रस्ते गुळगुळीत करण्याचा मानस आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या मुळ अंदाजामधील स्थानिक संस्था कर/ शासकीय अनुदान रू.३०.०० कोटी, मालमत्ता कर रू.५०.०० कोटी, नगररचना विभाग रू.३५.०० कोटी, शासकीय अनुदान रु.४०.०० कोटी,पाणीपट्टी रु.२५.०० कोटी व इतर वसुली रु.२०.५० कोटी अशी एकुण उद्दिष्टामध्ये रू.२००.५० कोटीची वाढ सुचविण्यात आली आहे.

**ठळक वैशिष्टये:-**

- क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांची उंची वाढविणे.
- महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे
- माँ साहेब मिनाताई ठाकरे कन्या सुरक्षा मुदतठेव योजना
- मा.बाळासाहेब ठाकरे मोफत अंत्यविधी योजना अतिरिक्त विशेष तरतुद
- पडेगाव मिटमिटा गट क्र.३०७ मध्ये स्थलांतरीत होणाऱ्या सफारी पार्कच्या जागेवर प्राथमिक स्वरुपाची कामे करणे.
- सिध्दार्थ उद्यान प्राणि संग्रहालयामध्ये नविन प्राणी/पक्षी ठेवण्यासाठी पिंजरे तयार करणे.
- महानुभाव आश्रम चौकात एक सुंदर, आकर्षक, भव्य प्रवेशद्वार स्वागत कमान उभारणे.
- पैठणरोडवर महानुभाव आश्रम चौक ते पैठणकडे जाणा-या सेंट जॉन शाळेजवळील ए.एस. क्लब लिंक रोडकडे, पैठणकडे जाणाऱ्या रस्त्याच्या मधोमध चौक सुशोभिकरण करणे.
- गोमटेश मार्केट येथील आर.सी.सी. पुल बांधणे.
- सिध्दार्थ जलतरण तलाव विविध विकास कामे करणे
- मालमत्ता सर्वेक्षण जी.आय.एस.मॅपींग
- घनकचरा व्यवस्थापन खर्च पावडर खरेदी
- शहरात विविध ठिकाणी कंपोस्टिंग पीट तयार करणे
- अग्निशमन दल सक्षमीकरण व बळकटीकरण करण्यासाठी विशेष तरतुद

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१७-२०१८ चे सुधारित अंदाज जमा रु. ७८७ कोटी ४५ लक्ष ५५ हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.६२ कोटी ९८ लक्ष २७ हजार असे एकुण जमा रु.८५० कोटी ४३ लक्ष, ८२ हजार आणि एकुण खर्च रु.८१६ कोटी ४३ लक्ष ६० हजार विचारात घेता रु.३४ कोटी ०० लक्ष २२ हजार शिलकीचे सुधारित अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

उपरोक्तनुसार प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये फेर फार, दुरुस्ती व वाढ करुन सन २०१८-२०१९ करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रु.१४४२ कोटी ०० लक्ष ५० हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक रु.३४ कोटी ०० लक्ष २२ हजार असे एकुण रु.१४७६ कोटी ०० लक्ष ७२ हजार जमा यामध्ये रु.१४७५ कोटी ८७ लक्ष ३० हजार खर्च विचारात घेता रु.१३ लक्ष ४२ हजार शिलकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात वसाहती आहेत. ज्यांनी बेटरमेंट चार्जेस भरले त्या भागात विकास कामे करण्यासाठी भरीव तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

माझ्या कार्यकाळात माननीय सभापती विधान सभा, महाराष्ट्र राज्य, श्री.हरीभाऊजी बागडे, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री.देवेंद्रजी फडणवीस, माननीय प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता पार्टी तथा खासदार श्री.रावसाहेबजी दानवे, महिला आयोग अध्यक्षा,मा.सौ.विजयाताई रहाटकर, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, औरंगाबाद डॉ.दिपकजी सावंत, मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे, मा.खासदार राज्य सभा,श्री.राजकुमारजी धुत, मा.आमदार श्री.अतुलजी सावे, औरंगाबाद (पुर्व), मा.आमदार श्री.संजयजी शिरसाट, औरंगाबाद (पश्चिम), मा.आमदार श्री.इम्तियाजजी जलील, औरंगाबाद (मध्य), तसेच विधान परिषद सदस्य मा.आमदार श्री.सतीष चव्हाण, मा.आमदार श्री.सुभाषजी झांबड, मा.आमदार,श्री.विक्रमजी काळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री.एकनाथजी जाधव, भाजपाचे शहर अध्यक्ष श्री.किशनचंदजी तनवाणी, भारतीय कामगार मोर्चा प्रदेशाध्यक्ष श्री.संजयजी केनेकर, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष श्री.अंबादासजी दानवे, यांचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत गेले. तसेच मा.महापौर व सर्व सन्माननीय पदाधिकारी व स्थायी समितीचे सन्माननीय सदस्य यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. यापूढेही माझे सर्व सहकारी शहर विकासाच्या कामात आवश्यक ते सहकार्य करतील अशी मी सर्वाकडून आशा बाळगतो.

प्रशासकीय पातळीवर मा.आयुक्त व त्यांचे सर्व सहकारी स्थायी समितीस विशेष सहकार्य करतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

शहरातील सर्व प्रसार माध्यमे व वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी यांचेकडून आजपर्यंत शहर विकासासाठी मला जे सहकार्य मिळाले आहे, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी असून यापूढे ही भविष्यात अशा प्रकारचे सहकार्य लाभेल अशी सर्वाकडून अपेक्षा व्यक्त करतो.

मा.महापौर :मा.सभापती यांनी अर्थसंकल्प सादर केला यासाठी सर्व अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे अभिनंदन करतो.सर्व समावेशक बजेट सादर केलेले आहे. अनेक प्रकल्प पुर्ण होण्याच्या दृष्टीने बजेट सादर केले आहे. सर्व सदस्यांना बजेटच्या प्रति देण्यात याव्यात. यात उत्पन्न १४७६ कोटी ७२ हजार व खर्च १४७५ कोटी ८७ लक्ष ३० हजार असा ३० लक्ष ४२ हजार शिल्लकीचा अर्थसंकल्प सादर केला यावर विचार विनिमय करणेसाठी विशेष बैठक घेण्यात येईल. जे बजेट सादर केले ते या ठिकाणी स्विकारण्यात येते.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी,
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

इति.अर्थसंकल्पिय विशेष सभा
दिनांक २९.०४.२०१८ (का.प.क्र.११)